**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर / येत्या २ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला मतमोजणी

- मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षण मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू

- महात्मा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत २ हजार ३९९ आजारांचा समावेश करायला महाराष्ट्र मंत्रिमंडळाची मंजुरी /विश्वचषक विजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघातल्या महाराष्ट्रातल्या खेळाडूंना रोख पुरस्कार देण्याचा निर्णय

- अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष डिक चेनी यांचं निधन

**आणि**

- आयसीसीनं जाहीर केलेल्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सर्वोत्कृष्ट संघात स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रिग्स आणि दीप्ती शर्मा यांना स्थान

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठीचा निवडणूक कार्यक्रम आज राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला. यानुसार येत्या २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज भरता येणार असून १७ नोव्हेंबरला अर्ज भरण्याची अंतिम मुदत आहे. १८ नोव्हेंबरला उमेदवार अर्जांची छाननी केली जाईल, २१ नोव्हेंबरला अर्ज माघारी घेता येईल तसंच २६ नोव्हेंबरला उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली जाईल असं वाघमारे यांनी सांगितलं. या निवडणुकीत एकूण १ कोटी ७ लाख ३

हजार ५७६ मतदार ६ हजार ८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड करतील.

ही निवडणूक ईव्हीएमद्वारेच होणार आहे, असं दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केलं. मतदार याद्यांमधल्या दुबार नावाबाबत निवडणूक आयोगाने दक्षता घेतली आहे, यासाठी एक टूल विकसित केल्याचं वाघमारे यांनी सांगितलं.

**- होल्ड - बाईट - वाघमारे - - (२९ सेकंद)**

दुबार नाव असलेल्या मतदाराने संपर्क केल्यानंतर प्रतिसाद दिला नाही तर त्याच्या नावापुढे सर्व मतदान केंद्रावर डबल स्टार म्हणून नोंद होईल. अशा मतदाराकडून आपण दुसऱ्या मतदान केंद्रावर मतदान करणार नाही असं हमीपत्र लिहून घेतलं जाईल, असं दिनेश वाघमारे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

निवडणूक आयोगानं आजपासून एसआयआर, म्हणजे मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षण मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू केला. नऊ राज्यं आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून एकंदर ५१ कोटी मतदारांची पडताळणी या मोहिमेत केली जाणार आहे. या मतदारांची पडताळणी करून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. यापूर्वी पहिल्या टप्प्यात बिहारमध्ये पडताळणी मोहीम राबवली होती.

दुसऱ्या टप्प्यात छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, पुदुच्चेरी, राजस्थान, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, अंदमान आणि निकोबार तसंच लक्षद्वीपमध्ये मतदारांची पडताळणी केली जाणार आहे. यापैकी तमिळनाडू, केरळ, पुदुच्चेरी आणि पश्चिम बंगालमध्ये २०२६मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांतर्गत उपचारांच्या यादीत सुधारणा करायला राज्य मंत्रीमंडळानं आज मान्यता दिली. त्यानुसार आता या योजनेत २ हजार ३९९ आजारांचा समावेश केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुंबईत बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली.

विश्वचषक विजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाच्या विजयात योगदान देणाऱ्या महाराष्ट्राच्या खेळाडू स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रीग्ज आणि राधा यादव या तिघींचा रोख पुरस्कार देऊन सन्मान करायचा निर्णयही या बैठकीत झाला.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज नवी दिल्ली इथं श्रीलंकेचे विरोधी पक्षनेते सजित प्रेमदासा यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, दोन्ही नेत्यांनी श्रीलंकेची आर्थिक स्थिती पूर्वपदावर आणण्यासाठीचे पर्याय, परस्परांमधले आर्थिक आणि गुंतवणूक विषयक संबंध अधिक दृढ करण्याबद्दल चर्चा केली.

**<><><><><>**

पेरू या देशानं मेक्सिकोशी असलेले राजकीय संबंध तोडल्याची घोषणा आज केली. मेक्सिकोनं पेरुचे माजी प्रधानमंत्री बेट्सी चावेझ यांना आश्रय देण्याचा निर्णय घेतल्यानंतर पेरूनं ही घोषणा केली. चावेझ यांच्यावर पेरुचे माजी अध्यक्ष पेड्रो कॅस्टिलो यांच्या नेतृत्वात २०२२ साली झालेल्या बंडात सहभागी असल्याचा आरोप आहे.

**<><><><><>**

शीख धर्मगुरू गुरू नानक यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु नानक यांचे आदर्श आणि मूल्यांचा स्वीकार करून चांगला समाज निर्माण करण्यासाठी प्रेरित करणारा हा दिवस असल्याचं मूर्मू आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाल्या आहेत.

<><><><><>

अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष डिक चेनी यांचं आज निधन झालं. चेनी यांनी माजी अध्यक्ष जॉर्ज एच डब्ल्यू बुश यांच्या मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री म्हणून काम पाहिलं होतं. १९९१ मध्ये झालेल्या आखाती युद्धात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका निभावली होती. त्यांनी माजी अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांच्या कार्यकाळात २००१ ते २००९ या कालावधीत उपाध्यक्ष पद भूषवलं होत. २००३ मध्ये झालेल्या इराक युद्धाचे ते समर्थक होते.

<><><><><>

प्रसिद्ध उद्योगपती आणि हिंदुजा उद्योगसमूहाचे अध्यक्ष गोपीचंद हिंदुजा यांचं आज लंडनमधे निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. ब्रिटनमधल्या सर्वात श्रीमंत व्यक्तिंमधे त्यांचा समावेश होता. मुंबईत हिंदुजा उद्योगसमूहातून त्यांनी कारकिर्दीला प्रारंभ केला होता. गेली दोन वर्षं हिंदुजा समूहाचं अध्यक्षपद त्यांच्याकडे होतं.

<><><><><>

आय सी सी अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं नुकत्याच झालेल्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचा त्यांचा सर्वोत्कृष्ट संघ आज जाहीर केला. या संघात विश्वचषक विजेत्या भारताच्या संघातल्या स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रिग्स आणि दीप्ती शर्मा या तीन खेळाडूंना स्थान मिळालं आहे. स्मृती हीनं स्पर्धेत पन्नास पेक्षा जास्त सरासरीनं ४३४ धावा केल्या, तर जेमिमाची ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्या सामन्यातली शतकी खेळी निर्णायक ठरली होती. स्पर्धेची सर्वोत्तम खेळाडू ठरलेल्या दीप्ती शर्मा हिनं २१५ धावा आणि २२ बळींसह अष्टपैलू कामगिरी नोंदवली होती.

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचा प्रचार आज संध्याकाळी संपला. पहिल्या टप्प्यासाठी येत्या ६ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या टप्प्यात

त १८ जिल्ह्यांमधल्या १२१ विधानसभा मतदारसंघासाठी, एक हजार ३१४ उमेदवार रिंगणात आहेत.

पहिल्या टप्प्यातल्या मतदानासाठी भारत निवडणूक आयोगानं चोख व्यवस्था केली आहे. पहिल्यांदाच, प्रत्येक मतदारसंघात एक सामान्य निरीक्षक तैनात असेल, त्यासोबतच सर्व मतदान केंद्रांवरच्या घडामोडींवर वेबकास्टिंगच्या माध्यमातून करडी नजर ठेवली जाणार आहे. कोणत्याही प्रकारच्या हिंसेबद्दल शून्य सहिष्णूता धोरण अंवलंबवायचे निर्देश जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना दिले असल्याचंही आयोगानं म्हटलं आहे. सुरक्षेच्यादृष्टीनं पुरेशा प्रमाणात केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचे जवान तैनात केले असल्याचंही आयोगानं कळवलं आहे.

दरम्यान आज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी, राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महाआघाडीच्या ज्येष्ठ नेत्यांसह, स्टार प्रचारकांनी जोरदार प्रचार केला.

**<><><><><>**

बिहारमध्ये संयुक्त जनता दलाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री राजीव रंजन उर्फ ललन सिंह यांच्या विरुद्ध आज मोकामा इथे आचारसंहितेचं उल्लंघन केल्याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली. जिल्हा प्रशासनानं नेमलेल्या पथकानं एका व्हिडीओ फुटेजच्या आधारावर ही तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे. यापूर्वीही मोकामा इथे केलेल्या एका कथित वक्तव्यासाठी ललन सिंह यांना निवडणूक आयोगानं नोटीस बजावली होती आणि २४ तासांच्या आत उत्तर मागितलं होतं.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला भरघोस यश मिळेल असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. प्रधानमंत्र्यांनी आज मेरा बूथ सबसे मजबूत या कार्यक्रमांतर्गत बिहारमधल्या महिला कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी मागच्या 20 वर्षांमधले

सर्व विक्रम मोडीत काढेल असा निश्चय इथल्या मतदारांनी केला असल्याचे त्यांनी सांगितले.

**<><><><><>**

पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरला पाकिस्तानचा प्रांत बनवण्याच्या कोणत्याही योजनेला आपला तीव्र विरोध असेल असं युनायटेड काश्मीर पीपल्स नॅशनल पार्टीनं स्पष्ट केलं आहे. याबाबत पक्षाचे प्रवक्ते सरदार नासिर अझीझ खान यांनी समाज माध्यमावरून पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. पाकव्याप्त काश्मीर आणि गिलगिट बाल्टिस्तानचा भूभाग हा पूर्वीच्या जम्मू आणि काश्मीर संस्थानाचा भाग होता, पाकिस्तानं अवैधरित्या हा भूभाग ताब्यात घेतला असून, त्यांना या भागाची स्थितीगती बदलण्याचा अधिकार नाही, असं त्यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><>//**